---------------------------------------------------------------------------------------------------

सेल्समन : काका ‘श्रीमंत व्हा १० दिवसांत’ हे पुस्तक घ्या ना...
फक्त एक हजार रुपये...

काका : नको...

सेल्समन : घ्या ना काका... वरच्या मजल्यावरच्या गुंड्याकाकांनी पण घेतले आहे...

काका : त्या, गुंड्याकाकांनी खरंच घेतलं आहे का?

सेल्समन (आनंदाने) : हो, हो खरंच!

काका : ठीक आहे मग... ११ दिवसांनी गुंड्याकाका श्रीमंत झाले की,
त्यांच्याकडून मी घेऊन येईन पुस्तक...

---------------------------------------------------------------------------------------------------

मास्तर : पप्पू, एवढे दिवस कुठे होतास? शाळेत आला नाहीस.

पप्पू : मास्तर मला ‘बर्ड-फ्लू’ झाला होता.

मास्तर : काहीही सांगू नकोस, हा आजार पक्ष्यांना होतो. तुला कसा झाला रे?

पप्पू : तुम्ही कुठं मला माणूस म्हणून वागवता?

जेव्हा बघावं तेव्हा मला कोंबडा करून वर्गाच्या बाहेर उभं करता.

---------------------------------------------------------------------------------------------------

पप्पू आपल्या बायकोला : तू खूप सुंदर दिसतेस.
बायको (स्वयंपाक घरातून) : हो का! असं का म्हणताय?
पप्पू : तुला बघून पोळ्या पण जळत आहेत.

---------------------------------------------------------------------------------------------------